महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/470 दिनांक : 22 एप्रिल, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 15/03/2021

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27/03/2021

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021.

8. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 04/04/2021.

9. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/394 दि. 05.04.2021.

10. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 05/04/2021.

11. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/395 दि. 06.04.2021.

12. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 09/04/2021.

13. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/423 दि. 09.04.2021.

14. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 13/04/2021.

15. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/426 दि. 14.04.2021.

16. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 21/04/2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना (कोविड-19) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात **"ब्रेक दि चेन"(BREAK THE CHAIN)** अंतर्गत संदर्भ क्र. 14 चे आदेशान्वये कोरोना विषाणूच्या वाढत्या पार्श्वभुमीवर संपुर्ण महाराष्ट्रात काही ठरावीक बाबींस दि. 30.04.2021 पावेतो प्रतिबंध करुन कडक निर्बंध लावण्याबाबतचे आदेश निर्गमीत केलेले असल्याने, राज्य शासनाकडील उक्त आदेश व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशातील संपुर्ण तरतूदी/ कडक निर्बंध चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात संदर्भ क्र. 15 चे आदेशान्वये दिनांक 30 एप्रिल, 2021 पावेतो यथास्थिती लागु करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 16 चे आदेशान्वये, संपूर्ण राज्यात कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावात अधिक वाढ होत असल्याने संदर्भ क्र. 14 चे आदेशान्वये लावण्यात आलेले कडक/प्रतिबंधात्मक निर्बंधामध्ये अंशत: सुधारणा करण्यात आलेले आहे व सदर सुधारीत निर्बधाचे काटेकोरपणे पालन करण्यास सुचीत केलेले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर,** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 16 चे आदेशान्वये, कडक/प्रतिबंधात्मक निर्बंधाचे बाबतीत केलेल्या अंशत: सुधारणा खालीलप्रमाणे चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात यथास्थिती लागु करीत आहे.

**अ) कार्यालय उपस्थिती :-**

**अ)** राज्य सरकार, केंद्र सरकार आणि स्थानिक प्रशासनाशी संबंधित सर्व शासकीय कार्यालये फक्त १५ टक्के कर्मचारी क्षमतेने कार्यरत राहतील. तथापी कोव्हीड-19 संबंधित अत्यावश्यक सेवांच्या कार्यालयांना यातून वगळण्यात येत आहे.

- इतर शासकीय कार्यालयांच्या बाबतीत अधिक उपस्थितीकरीता संबंधित कार्यालय प्रमुख यांनी स्थानिक आपत्ती प्राधिकरणाची परवानगी घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा.

**ब)** राज्य शासनाकडील "ब्रेक दि चेन" अंतर्गत निर्गमीत दि. 13.04.2021 रोजीच्या आदेशातील परिच्छेद-5 मध्ये नमूद असलेली इतर कार्यालये (अत्यावश्यक सेवेत नसलेले) 15 टक्के कर्मचारी किंवा 5 कर्मचारी यापैकी जी संख्या जास्त असेल त्या क्षमतेने कार्यरत राहु शकतील.

**क)** राज्य शासनाकडील "ब्रेक दि चेन" अंतर्गत निर्गमीत दि. 13.04.2021 रोजीच्या आदेशातील परिच्छेद-2 मध्ये नमूद असलेली अत्यावश्यक सेवेतील कार्यालये कमीत-कमी कर्मचारी किंवा 50 टक्के कर्मचारी या मर्यादेत सुरु राहतील. प्रत्यक्षात अत्यावश्यक सेवा पुरविणा-या कर्मचा-यांची संख्या आवश्यकतेनुसार 100 टक्के पर्यंत कार्यालय प्रमुखांव्दारे वाढविली जाऊ शकेल.

**ब) लग्न समारंभ :-**

लग्न समारंभ 25 व्यक्तींच्या उपस्थितीत फक्त एकाच हॉलमध्ये, 2 तासांमध्येच पूर्ण करावे लागतील. या नियमांचे भंग करणा-या कोणत्याही कुटूंबाला, हॉल मालक / चालकास व इतर संबंधितास रुपये 50,000/- इतका दंड आकारण्यात येईल. तसेच असे समारंभ ज्या जागेत होत असतील त्या जागेवर कोव्हीड-19 संबंधीची अधिसूचना लागू असेपर्यंत बंदी घालण्यात येईल.

**क) खाजगी प्रवासी वाहतूक :-**

**अ)** खाजगी प्रवासी वाहतूक (बसेस वगळता) फक्त अत्यावश्यक सेवा व वैध कारणांसाठीच केवळ वाहन चालक व 50 टक्के प्रवाशी क्षमतेने सुरु राहतील. तथापी सदर वाहतूक आंतरजिल्हा किंवा जिल्हयांतर्गत होणे अपेक्षीत नसून शहरापुरतीच मर्यादीत असणे अपेक्षीत आहे. आंतरजिल्हा किंवा जिल्हयांतर्गत प्रवास केवळ अत्यावश्यक सेवा किंवा वैद्यकीय निकडीचे कारण तसेच अंत्यविधीसारख्या टाळता न येण्यासारख्या कारणांसाठीच करता येईल. सदर नियमांचे भंग करणा-यांवर रुपये 10,000/- इतका दंड आकारण्यात येईल.

ब) खाजगी बसेसमध्ये एकून आसन क्षमतेच्या 50 टक्के प्रवाशांना परवानगी असेल. उभ्याने प्रवास करण्यास मनाई असेल.

क) खाजगी बसेस आंतरजिल्हा किंवा जिल्हयांतर्गत प्रवासाकरीता खालील बंधने पाळतील :-

- खाजगी बसेस वाहतूकदारांना शहरात जास्तीत-जास्त दोन थांबे घेता येईल. सदर थाब्यांची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांना द्यावी.
- खाजगी बसेसव्दारा प्रवास करणारा प्रवाशी गंतव्य ठिकाणी उतरताच, प्रवाशींच्या हातावर 14 दिवस होमक्वारंटाईनचा शिक्का मारण्यात यावा. सदर शिक्का खाजगी बसेस वाहतूकदार यांनी स्वत: बनवून घ्यावे.
- सर्व प्रवाशांचे प्रवेशावेळी थर्मल स्क्रिनींग करण्यात यावे. यादरम्यान एखाद्या प्रवाश्यांना लक्षणे आढळल्यास त्यांना तात्काळ कोव्हीड केअर सेंटर किंवा हॉस्पीटल मध्ये पाठविण्यात यावे.
- खाजगी बसेसव्दारा प्रवास करुन येणा-या प्रवाशांनी तात्काळ स्वत:ची तपासणी करुन घेण्याबाबत खाजगी बसेस वाहतूकदार यांनी प्रवाशांच्या निदर्शनास आणून द्यावे.
- उपरोक्त नियमांचे प्रथमत: भंग करणा-या खाजगी बस वाहतूकदार यांचेवर रुपये 10,000/- इतका दंड आकारण्यात येईल. वारंवार नियमांचे भंग होत असल्यास सदर खाजगी बस वाहतूकदार यांचा परवाना कोव्हीड-19 संबंधीची अधिसूचना लागू असेपर्यंत रद्द करण्यात येईल.

ड) सार्वजनिक प्रवासी वाहतूक :-

अ) राज्य शासन किंवा स्थानिक प्रशासनाच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील बसेसव्दारा 50 टक्के आसन क्षमतेने प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी असेल. परंतु प्रवाश्यांना उभे राहून प्रवास करण्यास मनाई असेल.

ब) आंतरजिल्हा किंवा जिल्हयांतर्गत लांब पल्ल्यांच्या रेल्वे किंवा बस खालील बंधने पाळतील :-

1) स्थानिक रेल्वे प्रशासन अधिकारी/एस.टी. बस अधिकारी यांनी त्यांचेकडील प्रवाशांची माहिती स्थानिक प्रशासनाचे नोडल अधिकारी यांना पुरवावी. नोडल अधिकारी यांनी त्यांचे स्क्रिनींग बाबत पुढील कार्यवाही करावी.

2) प्रवास करणारा प्रवाशी गंतव्य ठिकाणी उतरताच, प्रवाशींच्या हातावर 14 दिवस होम क्वारंटाईनचा शिक्का मारण्यात यावा. सर्व प्रवाशांचे प्रवेशावेळी थर्मल स्क्रिनींग करण्यात यावे. यादरम्यान एखाद्या प्रवाश्यांना लक्षणे आढळल्यास त्यांना तात्काळ कोव्हीड केअर सेंटर किंवा हॉस्पीटल मध्ये पाठविण्यात यावे.

3) प्रवास करुन येणा-या प्रवाशांनी तात्काळ स्वत:ची तपासणी करुन घेण्याबाबत बसेस वाहतूकदार यांनी प्रवाशांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर आदेशाची कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेश संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 22.04.2021 चे रात्री 08.00 वाजेपासून ते दिनांक 01.05.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागु राहतील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 22.04.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.**

स्वा/-

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई – 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
9. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर
10. स्टेशन मास्टर, दक्षिण रेल्वे, चंद्रपूर/बल्लारपुर/वरोरा
11. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
12. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
13. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
14. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)
15. सर्व शासकीय विभाग प्रमुख/बँक व्यवस्थापक

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हाधिकारी कार्यालय तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management,**
**Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 21st April, 2021**

**ORDER**
**Break The Chain**

---

**Reference:**

1. The Epidemic Diseases Act, 1897.
2. The Disaster Management Act, 2005
3. Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order No. DMU-2020/C.R.92/DMU-I, dated 2nd May 2020, 3rd May 2020, 5th May 2020, 11th May 2020, 15th May 2020, 1 7th May 2020, 19th May 2020, 21st May 2020, 31 May 2020, 4th June 2020, 25th June 2020, 29th June 2020, 6th July 2020, 7th July 2020, 29th July 2020, 4th August 2020, 19th August 2020, 31st August 2020, 30th September, 2020 and 14th October 2020, 23rd October, 2020, 29th October, 2020, 3rd November, 2020, 14th November, 2020, 23rd November, 2020, 27th November, 2020, 27th November, 2020, 21st December, 2020, 24th December, 2020, 29th December, 2020, 14th January, 2021, 19th January, 2021, 29th January, 2021, 24th February, 2021, 15th March, 2021, 27th March, 2021, 4th April, 2021,5th April, 2021, 13th April, 2021, 20th April, 2021 (along with any additions and clarifications thereof)
4. Ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-PM-1 (A) Dated 1st May 2020, 11th May 2020, 17th May 2020, 20th May 2020, 30th May 2020, 29th June 2020, 29th July 2020, 29th August 2020, 30th September 2020 and 27th October 2020, 25th November, 2020, 28th December, 2020, 27th January, 2021 and 23rd February, 2021

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has issued an Order dated 30th September, 2020 and 14th October, 2020 (extended by order dated 29th October, 2020, 27th November, 2020, 29th December, 2020 and 29th January, 2021 and 24th February, 202, 15th March, 2021, 17th March, 2021, 27th March, 2021, 4th April, 2021, 5th April, 2021, 13th April, 2021 and 20th April) for containment of COVID 19 in the State for the period upto 7 AM on 1st May, 2021 and issued revised guidelines by including certain activities from time to time vide above mentioned orders.

Scanned with CamScanner

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is threatened with the spread of COVID-19 virus, and therefore it is imperative to take certain emergency measures to prevent and contain the spread of virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The Disaster Management Act, 2005, finds it is expedient to enforce the following measures throughout the State from 8 PM on 22nd April, 2021 till 7 AM on 1st, May, 2021 to break the chain of transmission.

Now, therefore, in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues the following directions, that will remain in force throughout the state of Maharashtra from 8 PM on 22nd April, 2021 till 7 AM on 1st, May, 2021 –

a. **Office Attendance**

   a. All Government Offices (State, Central, under local authority) to operate only with 15 % attendance except for emergency services directly connected to management of COVID 19 pandemic.

      i. In the case of Mantralaya and Central Government offices in Mumbai Metropolitan Region, the Head of the Department can decide for higher attendance after seeking permission for the same from the CEO of the Maharashtra State Disaster Management Authority.

      ii. In case of other government offices, the Head of the Office can decide for higher attendance after seeing permission for the same from local Disaster Management Authority.

   b. For all other offices mentioned under Section 5 of Break the Chain Order dated 13th April, 2021, they should function only with 15% of their total attendance or 5 people whichever is more.

   c. For all the office works required for essential services mentioned in Section 2 of Break the Chain Order dated 13th April, 2021, should work at lowest required capacity for the same and in no case exceed 50%. Attendance of

Scanned with CamScanner

personnel actually delivering the essential services on the ground should also be minimised but can be extended up to 100% as per the requirements.

**b. Marriage Ceremony**

The marriage ceremony may be conducted only as a single event in a single hall not extending beyond 2 hours with maximum of total 25 persons attending the same. Any family seen to be flaunting the restraints or not following these in letter and spirit may be fined Rs 50000/-, and any location that is misused or is defaulting in spirit of the restrictions shall be closed till promulgation of Covid 19 as a disaster remains in force.

**c. Private Passenger Transport**

a. Private Passenger transport excluding buses can ply only for emergency or essential services or valid reasons with driver plus 50% of the seating capacity. These are not expected to be inter-district or inter-city and should be confined to the city of residence of the travellers. Inter-district or inter-city travel is allowed only if required for performing an essential service or in case of medical emergencies or attending unavoidable events like funerals or severe sickness of family. Anyone flouting the order in letter or spirit shall be punishable by fine of Rs 10000/-.

b. Private buses can ply with 50% of seating capacity with no standing travellers.

c. Inter-city or inter-district travel by private buses shall be subject to following controls :

i. Bus service operator must restrict the stoppages to maximum two in a city and shall inform local DMA about the same and the schedule. Local DMA may ask to change these if so desired.

ii. At the stoppages where passengers are alighting all passengers shall be stamped on the hand for 14 days home quarantine. This stamping must be done by operator.

Scanned with CamScanner

iii. Thermal scanners shall be used and anyone with symptoms shall be moved to corona care centres or to a hospital.

iv. Local DMA may decide to do the RAT test at the alighting point by appointing one of the authorised labs to give these services. Cost of the test, if so decided shall be borne by the passenger/ service provider.

v. If any operator is found to be flouting these guidelines, then DMA may levy a fine of 10000/-. Repeated defaults will lead to cancellation of license to operate till end of notification of COVID 19 as a pandemic.

vi. The local Disaster Management Authority can waive off the rules regarding mandatory stamping for buses arriving from certain origins as per the local conditions.

**d. Public Passenger Transport**

**a.** Only the following categories of people will be allowed to use local trains, metro and mono rail services (excepting long distance trains)

- All Government personnel (State/ Central/ Local), Tickets/ passes to be issued to the above category of personnel on the basis of a Government issued identity card only.

- All Medical Personnel (Doctors/ paramedics/ lab technicians/ hospital and medical clinic staff etc). Tickets/ passes to be issued on the basis of a identity card issued by the concerned medical organization.

- Any persons needing medical treatment or specially abled persons and one person accompanying the needy.

**b.** State government or local government owned public buses shall ply at 50% of the capacity with no standing passengers.

**c.** Inter-city or inter-district travel by long distance trains and buses shall be subject to following controls:

Scanned with CamScanner

i. Local Railway officers/ MSRTC officers shall provide all the information that local DMA may require for screening the people travelling by these trains and alighting in their jurisdictions.

ii. At the stoppages where passengers are alighting, all passengers shall be stamped on the hand for 14 days home quarantine. Thermal scanners shall be used and anyone with symptoms shall be moved to corona care centres or to a hospital.

iii. Local DMA may decide to the RAT test at the alighting point by appointing one of the authorised labs to give these services. Cost of the test, if so decided shall be borne by the passenger.

iv. The local Disaster Management Authority can waive off the rules regarding mandatory stamping for buses arriving from certain origins as per the local conditions.

e. All other conditions other than the ones specified in this order will be in accordance with the Government Order dated 13th April, 2021 and additions/ clarifications already issued thereof by the State Government.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(SITARAM KUNTE)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

Scanned with CamScanner